# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०१/०४/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. कोंढाळी :— अंतर्गत १४ कि.मी. अंतरावरील मौजा वाई येथे दिनांक २६/०३/२२ चे २०.०० वा. ते दिनांक २७/०३/२२ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी व त्यांची पत्नी शेतात गेले असता **कुसुंमबाई विश्वासराव कोल्हे, वय ८२ वर्ष, रा. वाई** मृतक हि एकटिच घरी हाजर असतांना तिने इनो पॉकीट ची पुडी समजवुन गहु व धान्या मध्ये टाकण्याचे किटक नाषक चुकीने पिल्याने तिची प्रकृती खराब झाली. तिला उपचारा करीता ग्रामीण रूग्णालय काटोल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन उपचारापुर्वी मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— साहेबराव विश्वास कोल्हे, वय ५५ वर्ष, रा. वाई यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा भोजराज तांदुळकर हे करीत आहे.

२) पो.स्टे. कोंढाळी :— अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मौजा बाजारगाव येथे दिनांक ३१/०३/२२ चे ०७.४५ वा. दरम्यान **सौ.सिंदुबाई ताराचंद बाजनघाटे (मृतक), वय ४५ वर्ष, रा. बाजारगुव ता.जि. नागपुर** हि नळावरून पाणी आणुन कुलरमध्ये पाणी भरत असतांनी अचानक कुलरचा करंट लागला. तिला उपचाराकरिता लता मंगेशकर हॉस्पीटल डिगडोह नागपुर येथे नंले असता तिला तपासुन डॉक्टरांनी मृत घोषित केले. एम.आय.डी.सी पोस्टे नागपुर शहर येथुन पोस्टेला कगदपत्र प्राप्त वरून सदरचा मर्ग नोंद करून तपासत घेतला.

सदर प्रकरणी सर तर्फे सफौ योगेश तिवारी पो.स्टे. एमआयडीसी नागपूर शहर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सुनिल बन्सोड हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**